उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १ ऑक्टोबर १९९६

अधिसूचना

मुंबई विद्युतशुल्क अधिनियम, १९५८.

क्रमांक: इलडी १०९६/सीआर २२८६४/ऊर्जा२ : मुंबई विद्युतशुल्क अधिनियम, १९५८ [१९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०] याच्या अनुसूचीतील भाग अ, ब, क, फ व ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंदर्भात त्याला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इलडी १०९४/सीआर२४०१/ऊर्जा२, दि. १.९.९४ व क्र. इलडी १०९४/सीआर २४०१[तीन]/ऊर्जा२, दि. ११.११.९४ चे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन, याव्दारे ऑक्टोबर १९९६ या बिलींग महिन्यापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात भाग अ, ब, क, फ आणि ग याखाली होणाऱ्या वीज वापरासाठी खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युतशुल्काचे दर विनिर्दिष्ट करीत आहे -

अनुसूची

| [१] | [२] |
|---|---|
| अ] भाग -अ | वापर आकाराच्या १० टक्के |
| ब] भाग -ब | वापर आकाराच्या १० टक्के |
| क] भाग -क | वापर आकाराच्या ७ टक्के |
| ड] भाग -फ | वापर आकाराच्या ५ टक्के |
| इ] भाग -ग | ३० पैसे प्रति युनिट |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[प्र. बा. पाटील]
शासनाचे अवर सचिव

महाराष्ट्र शासनाच्या दि. १.१०.९६च्या असाधारण राजपत्र भाग ४ब मध्ये प्रसिध्द करून त्याच्या ४०० प्रती या विभागाला पाठवाव्यात.

[प्र. बा. पाटील]
शासनाचे अवर सचिव